आरोग्य सेवा संचालनालय,
(महाराष्ट्र राज्य)
'आरोग्य भवन' सेंट जार्जेस रुग्णालय, आवार पी. डिमेलो रोड, मुंबई - ४००००१

| | | |
|---|---|---|
| कार्यालय | दुरध्वनी ०२२ | Website : http:// arogya.maharashtra.gov.in<br>Email : dhs_2005@rediffmail.com<br>Email : miscell@rediffmail.com<br>Email : aodesk2adhs@gmail.com |
| संचालक | २२६२१०३१-३६ | |
| सहसंचालक (अर्थव प्रशासन) | २२६२११८६ | |
| मुख्य प्रशासकीय अधिकारी | २२६२१९७३ | |
| प्रशासकीय अधिकारी | २२६२६२०४ | |
| | क्रसंआसे/मवैआसे/२अ/टे-७/बंधप.नि./जा.क्र. 1093 /२०<br>दि. 8/10/२०२० | |


प्रति,

उपसंचालक, आरोग्य सेवा,

परिमंडळ (सर्व)

विषय- बंधपत्रित (एमबीबीएस) वैद्यकीय अधिका-यांच्या नियुक्ती बाबत.

संदर्भ- १) शासन निर्णय क्रमांकः एमईडी- १०१७/प्र.क्र.४५५/१७/शिक्षण - २, दि.१२/०६/२०१८

२) शासन निर्णय क्रमांकः एमईडी- १००७ / सीआर- ४९० /०७ /शिक्षण - २, दि.०८/०२/२००८

३) शासन निर्णय क्रमांकः डब्ल्युपीएम - १०११/प्र.क्र.३५२/११/शिक्षण - २, दि.०४/०४/२०१२

४) संबंधित उमेदवारांचे अर्ज

उपरोक्त विषयाच्या संदर्भात संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुंबई यांनी बंधपत्रित उमेदवारांना वैद्यकीय अधिकारी रिक्त असलेले पद संस्था स्तरावर भरण्याबाबत कळविलेले आहे. त्याअनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, सोबतच्या जोडपत्र-१ मध्ये नमूद केलेल्या उमेदवारांचे बंधपत्रित वैद्यकीय अधिकारी म्हणून नेमणूक मिळणे बाबतचे ०९ अर्ज या संचालनालयास प्राप्त झालेले आहेत.

सोबत जोडलेल्या नमूद केलेल्या वैद्यकीय अधिका-यांना त्यांची शैक्षणिक पात्रता व सदर उमेदवारांचे आधारकार्ड, पॅनकार्ड, महाविद्यालयीन ओळखपत्र/मतदान ओळखपत्र / शिधावाटप पत्रीका (रेशन कार्ड) इत्यादी मूळ कागतपत्रांच्या प्रती तपासून तसेच यापूर्वी संबंधित उमेदवारास बंधपत्रित उमेदवार म्हणून १ वर्षाची नेमणूक देण्यात आलेली नसल्याची खात्री करुनच आपल्या स्तरावरुन प्राधान्याने आदिवासी भागातील आवश्यकतेनुसार जेथे पद रिक्त आहे, अशा ठिकाणी प्रथम बंधपत्रित वैद्यकीय अधिकारी म्हणून पदस्थापना देण्यात यावी. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालक, आरोग्य सेवा, मुंबई व संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना कळविण्यात यावा. आपणांस सुचित करण्यात

Scanned with CamScanner

येते की, सर्व कागदपत्र आपल्या स्तरावरुन काटेकोरपणे तपासून भविष्यात खोटया प्रमाणप... प्रकरण उद्भवल्यास आपणास जबाबदार धरण्यात येईल.

आपल्या स्तरावरुन दिल्या जाणा-या नियुक्ती आदेशात पुढील अटींचा समावेश करावा.

" सदर वैद्यकीय अधिका-यास नेमणुक दिलेल्या ठिकाणीच संपूर्ण बंधपत्र कालावधी अखंडीत पूर्ण करणे आवश्यक राहिल."

संदर्भिय क्र.३ च्या शा.नि.मधील ( ब ) २ Xii वरील प्रक्रियेद्वारे नियुक्ती देण्यात आलेला उमेदवार त्याच्या नियुक्तीच्या ठिकाणी विहीत मुदतीत रुजू न झाल्यास वा सदर उमेदवाराने रुजू होऊन बंधपत्रित सेवा खंडीत केल्यास, सदर उमेदवाराने बंधपत्राचा भंग केला असे समजून योग्य ती पुढील कार्यवाही एकतर्फी करण्यात येईल. तथापि यास खालील प्रकरणी अपवाद करण्यात येईल.

I. जर एखाद्या महिला उमेदवाराची बंधपत्रित सेवा गर्भधारणेमुळे खंडीत झाली असेल तर अशा उमेदवारास पुढील नियुक्ती प्रक्रियेत नियमित उमेदवाराप्रमाणेच नव्याने अर्ज सादर करावा लागेल व नियुक्ती मिळाल्यास सदर उमेदवाराने बंधपत्रित सेवेस नव्याने प्रारंभ केला असे समजण्यात येईल.

II. एखाद्या उमेदवाराची बंधपत्रित सेवेच्या व्याख्येत मोडणा-या अन्य स्थायी सेवेत नियुक्ती झाल्यास सदर उमेदवाराची बंधपत्रित सेवा सदर उमेदवार उक्त स्थायी सेवेत रुजू झाल्यापासून नव्याने प्रारंभ झाली असे समजण्यात येईल.

संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णय क्र.एमईडी-१००७/सीआर-४९०/०७/शिक्षण-२ दि.०८/०२/२००८ मधील परिच्छेद-२ ( २ ) व ३ ( २ ) येथील तरतुदीनुसार नियुक्ती दिलेला उमेदवार १५ दिवसांच्या आत नियुक्तीच्या ठिकाणी रुजू झाला नाही , तर सदर शासन निर्णयामधील परिच्छेद-२ ( १ ) व ३ ( १ ) येथे नमूद केल्याप्रमाणे दंड वसूल करण्याबाबत संचालक, वैद्यकीय शिक्षण संबंधित अधिष्ठातांमार्फत कारवाई करण्यात येईल.

त्याचप्रमाणे जे वैद्यकीय अधिकारी बंधपत्रित कालावधी पूर्ण करतील त्यांची नावे व जे वैद्यकीय अधिकारी बंधपत्र कालावधी अर्धवट सोडतील त्यांची नावे वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई व संचालनालयास न चुकता सादर करावी.

5/10.

(डॉ साधना तायडे)
संचालक, आरोग्य सेवा, मुंबई,

( मा.आयुक्त यांची मान्य टिपणीनुसार)

Scanned with CamScanner

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | दुरध्वनी क्रमांक | महाविद्यालयाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | शैक्षणिक अर्हता | नियुकती द्यावयाचे मंडळ |
|---|---|---|---|---|---|---|
| **स्थायी नोंदणी प्रमाणपत्राबाबत विशेष सुचना -** सदर उमेदवारांनी अयुक्तालयाकडे सादर केलेल्या अर्जासोबत स्थायी नोंदणी प्रमाणपत्र जोडलेले नाही.त्यामुळे सदरहू वंधपत्रित उमेदवारांना नियुक्ती देण्यापूर्वी त्याच्याकडील इतर कागदपत्रासह स्थायी नोंदणी प्रमाणपत्र तपासून त्यानंतर नियुक्ती देण्याची कार्यवाही करण्यात यावी. | | | | | | |
| १ | डॉ विदुषी ममगेन | ८२९१५८८२११ | जी.एम.सी मेडीकल कॉलेज कोल्हापूर | २०१८ | एम.बी.बी.एस. | कोल्हापूर |
| २ | डॉ तेजस्वीनी तात्यासो जाधव | ९४४५१८४४७० | बी.जे.मेडीकल कॉलेज पुणे | २०१९ | एम.बी.बी.एस. | पुणे |
| ३ | डॉ.मंजुषा बबनराव तागड | | राजश्री छत्रपती शाहू महाराज वैदयकिय महाविदयालय कोल्हापूर | २०१३ | एम.बी.बी.एस. | नाशिक |
| 4 | डॉ.कालभांडे समृदधी विनोद | ९५५२५७०५९२ | इंदिरा गांधी वै.म.नागपूर | २०१४ | एम.बी.बी.एस. | नागपूर |
| ५ | डॉ भारत बाळू चव्हाण | ७७९८७८०८३७ | डॉ व्ही एम जी मेडीकल कॉलेज सोलापूर | २०१९ | एम.बी.बी.एस. | पुणे |
| ६ | डॉ राहुल छोटू पाटील | ९७६४४२७६०० | डॉ व्ही एम जी मेडीकल कॉलेज सोलापूर | २०१९ | एम.बी.बी.एस. | पुणे |
| ७ | डॉ अक्षय नागोराव जाधवर | ९०४९७७७०८१ | डॉ व्ही एम जी मेडीकल कॉलेज सोलापूर | २०१९ | एम.बी.बी.एस. | पुणे |
| ८ | डॉ आकाश कन्हैयालाल यादव | ९७६५९७८९४७ | डॉ व्ही एम जी मेडीकल कॉलेज सोलापूर | २०१९ | एम.बी.बी.एस. | पुणे |
| ९ | डॉ दिपक भरत गपाट | ९४०३३२४२८० | डॉ व्ही एम जी मेडीकल कॉलेज सोलापूर | २०१९ | एम.बी.बी.एस. | पुणे |

Scanned with CamScanner